“मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्न आणि रोजगार वाढीसाठी कृषि आधारित उद्योगांचा विश्लेषणात्मक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखे अंतर्गत ‘वाणिज्य’ पीएचडी पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधासाठी आराखडा

संशोधक

कु. रविंद्र भिकाजी भिसे

वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

मार्गदर्शक

श्री. प्रा. डॉ. भारत टी निर्वळ

स्व. नितीन महाविद्यालय पाथरी

ता. पाथरी, जि. परभणी

संशोधन केंद्र

स्व. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय परभणी

२०२५

“मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्न आणि रोजगार वाढीसाठी कृषि आधारित उद्योगांचा विश्लेषणात्मक अभ्यास”

प्रस्तावना :-

आपला भारत देश हा ‘कृषिप्रधान’ देश म्हणून ओळखला जातो. भारतीय शेती क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी बघितले. तर असे दिसून येते की, भारतीय शेती ही पारंपरिक व उदरनिर्वाह या प्रकारची होती. शेती करीत असताना प्राथमिक स्तरावर भारतीय शेतकरी हे खाद्य पिकांचे उत्पादन प्रामुख्याने घेत असत. यामुळे कृषि क्षेत्राकडे कृषि उद्योग तथा कृषि आधारित उद्योग तसेच व्यापारी दृष्टीने पाहिले जात नव्हते. तसेच येथील भारतीय शेतकरी हा आपली शेती ही पहिले जैविक अथवा सेंद्रिय पद्धतीने करत होते. परंतु, याच शेतीमधून भारतीय शेतकऱ्यांचे आणि संपूर्ण देशवासियांचे पोट भरणे शक्य नव्हते. आमचे शेतकरी सर्व भारतीयांचे पोट भरण्यासाठी अन्न देण्यासाठी कृषि क्षेत्रात खूप कष्ट करतात. आमचे शेतकरी देशाला अन्नधान्यांचा पुरव ठा करण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत कायम उभे राहिले आहे आणि यापुढेही देखील असणार आहे. तसेच भारतीय शेतकरी हे त्यांच्या कर्तृत्वासाठी सर्वात जास्त समर्पित आहेत. ज्याप्रमाणे भारताचे सैनिक देशाचे रक्षण करतात. त्याचप्रमाणे भारतीय शेतकरी हा आपल्या सर्वांना दररोज जेवू घालतात. याच कारणामुळे भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी ‘जय जवान जय किसान’ असे म्हटले होते.

जर आपण सर्व साधारणपणे कृषि क्षेत्राबद्दल बोललो तर त्याचा अर्थ असा होतो की, शेती कापणी व पीक घेण्याशी संबंधित आहे. परंतु, व्यापारी, व्यावसायिक आणि औद्योगिक कृषि क्षेत्राचा अर्थ थोडा वेगळा आहे. येथे फक्त कापणी आणि पीक घेणे एवढाच अर्थ नाही. तर त्यात पशुपालन, दुग्धव्यवसाय, मधूमक्षिका, कुक्कुटपालन, मासेमारी आणि वनीकरण यांचा

समावेश होतो. 'शेती' हा अन्न आणि जीवन जगण्यासाठी उपजीविका भागविण्याचा अत्यंत महत्त्वाचा भाग असून, त्याच बरोबर आर्थिक व्यवस्थेचा तोही एक कणा आहे. कृषि क्षेत्र केवळ अन्न आणि कच्चा माल पुरवतच नाही तर भारतीय लोकसंख्येच्या मोठ्या प्रमाणात उत्पन्न आणि रोजगाराच्या संधी देखील देते. शेती आणि कृषि क्षेत्राचे फायदे बघितले तर, शेती लोकांची भुक भागविणे, कृषि क्षेत्र आपल्या देशाच्या अर्थ व्यवस्थेला चालना देते, उद्योग व्यापाराला मोठ्या प्रमाणात मदत होते, त्यातून बेरोजगारांना दोन पैसे व रोजगार मिळतो, शेती तसेच कृषिक्षेत्रापासून मिळणारा महसूल सरकारला जनहिताच्या कार्याकरिता हातभार लावत असतो. भारतीय शेतीत दुहेरी मान्सूनमुळे वर्षातुन दोनदा पीक कापणी होते. भारताच्या कृषी क्षेत्रातील स्थैर्याचे एक प्राथमिक कारण म्हणजे जमीनदारी व्यवस्था . ही कृषी प्रणाली प्रामुख्याने बंगालमध्ये प्रचलित होती, जी ब्रिटिश भारताची तत्कालीन राजधानी होती. या व्यवस्थेनुसार, बहुतांश नफा शेती करणाऱ्यांऐवजी टोलन डाउनर्स म्हणजे जमीनदारांकडे गेला. ब्रिटिश काळातील शेतीच्या दुर्दशेनंतर भारतीय स्वातंत्र्यानंतर कृषि क्षेत्रात मोठा बदल झाला. स्वातंत्र्योत्तर काळात कृषी विकासासाठी महत्त्वाच्या धोरणांचा अवलंब करण्यात आला. त्यात अन्नधान्य उत्पादन वाढवणे हे नवीन सरकारचे तात्कालिक लक्ष्य होते. नगदी पिकांचे अन्न पिकांमध्ये रूपांतर करणे. आधीच लागवड केलेल्या जमिनीवर पिके वाढवणे. लागवडीयोग्य जमीन लागवडीखाली आणणे आणि पडीक जमीन नांगरून लागवडीखाली आणणे इत्यादी गोष्टींचा समावेश होता. पुढे भारतात झालेल्या हरितक्रांती मुळे मोठा बदल झाला. त्यामुळे देशाचे कृषी क्षेत्र आधुनिक आणि तंत्र स्नेही होऊन त्यास औद्योगिक रुप येऊ लागले. त्यास कृषि उद्योग अथवा कृषि आधारित उद्योग अशी संज्ञा मिळत गेली.

''कृषी उद्योग हा एक उत्तम असा उद्योग आहे कृषीमध्ये विविध कृषी आधारित आणि शेतात व्यवसायदृष्टिकोनातून तंत्रज्ञानाच्या दृष्टिकोनातून

व्यवसाय आणि उत्पादन दृष्टीकोनातून उद्योग तयार करणे म्हणजेच कृषी उद्योग आहे”.

कृषि उद्योग अथवा कृषि आधारित उद्योग:-

भारतीय अर्थव्यवस्था ही मुख्यतः कृषि क्षेत्रावर आधारित आहे. देशाच्या औद्योगिक आणि व्यावसायिक विकासाच्या दृष्टीने विचार केल्यास भारतीय शेती ही कृषि, वने,मत्स्य, भांडवल तसेच तंत्रज्ञान इत्यादींचा अंतर्भाव भारतीय कृषी उद्योग यांमध्ये होतो. कृषी उद्योग उत्तम उद्योग आहे आपल्या भारतामध्ये उद्योग हा कृषीच्या आधारावरती अर्थशास्त्र चालत असतो. त्यामुळे कृषी क्षेत्र हे खूप भाग्यवंत आणि विकसनशील क्षेत्र आहे. साखर उद्योग, कापड उद्योग, मत्स्यपालन उद्योग, रेशीम उद्योग, दुग्धव्यवसाय तसेच कृषि अन्न प्रक्रिया उद्योग यांसारखे उद्योग हे कृषि उद्योगांमध्ये समाविष्ट होतात. शेती उत्पादनात भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. भारतीय आर्थिक सर्वेक्षण 2020-21 नुसार, कृषी क्षेत्राने भारतीय कर्मचाऱ्यांपैकी 50% पेक्षा जास्त रोजगार दिला आणि देशाच्या GDP मध्ये 20.2% योगदान दिले. 2016 मध्ये, पशुसंवर्धन, वनीकरण आणि मत्स्यपालन यांसारख्या कृषी आणि संबंधित क्षेत्रांचा GDP (एकूण देशांतर्गत उत्पादन) 17.5% वाटा होता आणि 2020 मध्ये सुमारे 41.49% कर्मचारी होते. भारताचा क्रमांक सर्वात जास्त निव्वळ पीक क्षेत्रासह जगात प्रथम आणि त्यानंतर अमेरिका आणि चीन आहे. भारताच्या जीडीपीमध्ये कृषी क्षेत्राचे आर्थिक योगदान देशाच्या व्यापक-आधारीत आर्थिक वाढीसह सातत्याने घटत आहे. तरीही, कृषी हे लोकसंख्याशास्त्रीयदृष्ट्या सर्वात व्यापक आर्थिक क्षेत्र आहे. आणि भारताच्या एकूण सामाजिक-आर्थिक जडणघडणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. मार्च-जून 2020 मध्ये एकूण कृषी वस्तूंची निर्यात 3.50 अब्ज अमेरिकन डॉलर होती. भारताने 2013 मध्ये 38 अब्ज अमेरिकन डॉलर किंमतीची कृषी उत्पादने निर्यात केली, ज्यामुळे तो जगभरात सातव्या

क्रमांकाचा कृषी निर्यातदार आणि सहावा सर्वात मोठा निव्वळ निर्यातदार बनला. त्यातील बहुतांश कृषी निर्यात विकसनशील आणि कमी विकसित राष्ट्रांना सेवा देतात. देशाचा नुकताच अंतरिम आर्थिक बजेट सादर झाला असून, 2023-24 घ्या सुधारित अंदाजामधील एकूण खर्च 44.1 लाख कोटी रुपयांवरुन 2024-25 मध्ये 47.66 लाख कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे. म्हणजेच, गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पाच्या तुलनेत 6.13% वाढ झाली आहे. तथापि, कृषि क्षेत्रासाठी अर्थसंकल्पी तरतूद केवळ 1.267 लाख कोटी रुपयांवरुन 1.275 लाख कोटी रुपयांपर्यंत वाढली वाढली आहे. जी मागील अर्थसंकल्पाच्या तुलनेत 0.65 टक्क्यांनी जास्त आहे.

महाराष्ट्र राज्याच्या कृषी उद्योगाच्या दृष्टीने राज्यातील साखर उद्योग हा कृषिआधारित असा प्रमुख उद्योग आहे. तसेच 'महाराष्ट्र' हा देशाचा कृषी आणि औद्योगिक क्षेत्राचा ऊर्जास्त्रोत आहे. देशाच्या दहा टक्क्यांहून कमी क्षेत्रफळ व लोकसंख्या असलेले महाराष्ट्राचे राष्ट्रीय स्थूल उत्पादनामधील योगदान 12.4% इतके आहे. राज्याची 65% लोकसंख्या कृषी आणि कृषी संबंधित व्यवसाय क्षेत्रांशी जोडलेली आहे. महाराष्ट्र राज्यात प्रमुख्याने तांदूळ, ज्वारी, बाजरी, गहू, तूर, मुग, उडीद, हरभरा, आणि इतर डाळींचे उत्पादन होते, भुईमूग, सुर्यफुल, सोयाबीन, सरकी या सारख्या तेलबिया पिके, ऊस आणि हळद ही नगदी पिके घेतली जातात. या संबंधित कापणीनंतर पिकांचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि अन्नधान्याची नासाडी टाळण्यासाठी अन्न प्रक्रिया उद्योगाला चालना देणे अत्यंत गरजेचे आहे. या करिता 'महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळा'ची स्थापना 15 डिसेंबर 1965 रोजी कंपनी कायदा 1956 करण्यात आली आहे. मंडळाच्या स्थापनेपासूनच कंपनीने शेतकरी बांधवांना कृषी उत्पादन वाढीसाठी सदैव सामर्थ्य दिले आहे. तसेच शेतकरी आणि कृषि आधारित उद्योग क्षेत्र डोळ्यांपुढे ठेवून राज्य सरकारने "मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना" ही

100% राज्य पुरस्कृत योजना 2017-18 या आर्थिक वर्षात सुरु करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यातील कृषिआधारित उद्योग यांमध्ये कापड उद्योग, तेल गिरण्या, तंबाखू उद्योग, डालमील, वाईन रबर उद्योग यांसारख्या उद्योगांचा समावेश होतो. तर वन उत्पादनांवर आधारित उद्योग यात लाकूड कापण्याच्या गिरण्या, औषधी निर्मिती उद्योग, कागद उद्योग, आगपेटी कारखाने, फर्निचर निर्माण उद्योग इत्यादी प्रमुख कृषि आधारित उद्योग आहेत.

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्रातील 'मराठवाडा' या राज्याच्या मध्यवर्ती आणि अति मागासलेल्या विभागाची निवड करण्यात आली आहे. मराठवाड्यातील कृषि उद्योग आणि कृषि आधारित उद्योगांचा त्यामध्ये समावेश असेल, मराठवाड्यातील धाराशिव ज्वारीसाठी तर जालना जिल्हा हा मोसंबी तसेच छत्रपती संभाजीनगर मधील दौलताबादची सीताफळे फळपिकांसाठी प्रसिद्ध आहे.

विषय निवडीचे समर्थन:-

कुठल्याही व्यावसायिक विषयाचा अभ्यास करताना कोणता उद्योग व्यवसाय औद्योगिक, सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेवर परिणाम करत असतो. अशा उद्योग व्यवसायांमध्ये कृषि उद्योग अथवा कृषि आधारित उद्योग हा एक महत्त्वाचा उद्योग व्यवसाय आहे. औद्योगिक क्षेत्रात झालेल्या अनेक बदलांमुळे उद्योग व्यवसायांचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला आहे. त्यामध्ये कृषि उद्योग अथवा कृषि आधारित उद्योगांचा महत्त्वाचा वाटा राहिला आहे. पुर्वी ग्रामीण भागांमध्ये तंत्रज्ञान, दळणवळण, कुशल मनुष्यबळाच्या अभावी गावखेड्यांतुन कच्चा माल शहरी कारखान्यात आणून त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग चालत असे. परंतु, आजच्या तांत्रिक आणि डिजिटल युगामध्ये मोठी औद्योगिक प्रगती झाल्यामुळे ग्रामीण भागांमध्ये

देखील चांगले कृषि उद्योग अथवा कृषि आधारित उद्योग, अन्न प्रक्रिया उद्योग उभे राहत आहे. त्यामुळे शेतकरी, मजुर, बेरोजगारांना गावातल्या गावात चांगला रोजगार आणि आर्थिक उत्पन्न मिळत आहे. परंतु, असे कृषी उद्योग उभे राहत असताना अनेक अडचणी येतात. आणि ते उभे करण्यात शासकीय धोरणांचा अभाव यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे ग्रामीण भागाचा आणि प्रामुख्याने कृषि क्षेत्राचा आर्थिक आणि व्यावसायिक विकास व्हावा. तसेच अल्प भूधारक शेतकरी, मजुर, कष्टकरी, बेरोजगारांना रोजगार भेटून दोन पैसे मिळावे. या उणीवामुळे प्रस्तुत शोधप्रबंधासाठी “मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्न आणि रोजगार वाढीसाठी कृषि उद्योग अथवा कृषि आधारित उद्योगांचा विश्लेषणात्मक अभ्यास” या शीर्षकाची निवड केली आहे. या शोधप्रबंधासाठी ‘मराठवाडा’ या आठ जिल्ह्यांच्या विभागीय मंडळातील कृषि क्षेत्र, शेती पध्दती, कृषि आधारित उद्योग, कृषि उत्पादनांवर प्रक्रिया करणारे उद्योग, शासकीय धोरणे आणि योजना या व इतर घटकांचा आढावा घेतला जाणार आहे.

कायम दुष्काळी भाग म्हणून ‘मराठवाडा’ विभागाकडे पाहिल्या जाते. तरी देखील मराठवाडा विभागाचा शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे. निजामाच्या तावडीतून 17 सप्टेंबर 1948 रोजी मराठवाडा स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यनंतर मराठवाड्यात किती कृषि उद्योग उभे राहिलेत?. येथील औद्योगिक क्षेत्रात कृषि उद्योगांना कितपत वाव आहे?.शेतकऱ्यांना कृषि उद्योगांचा कुठल्या प्रकारे लाभ होऊ झाला आहे का?. कृषि उद्योग उभारणीसाठी कृषि विभाग, कृषि विद्यापीठ, जिल्हा उद्योग केंद्रे जागरूक आहे का?. कृषि उद्योगांसमोरील काही अडीअडचणी,उणीवा,समस्या आहेत काय?. येथे दळणवळणाच्या सुविधा आहे का?. कृषि उद्योगांना मार्गदर्शन करणारी काही शासकीय यंत्रणा आहे का? यांसह अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे:-

1. शेती आणि कृषि आधारित उद्योगांच्या विकासासाठी आवश्यक असणारी माहिती अभ्यासणे.
2. शेती आणि कृषि उद्योग विकासासाठी आवश्यक असणारी शासकीय धोरणे यांचा अभ्यास करणे.
3. शेती आणि कृषि उद्योजकांना आर्थिक स्थिरता असल्यास समाजस्वास्थ्यावर होणारा परिणामांचे विवेचन करणे.
4. शेती आणि कृषि आधारित उद्योगांची असणारी उपयुक्ततेचा अभ्यास करणे.
5. कृषि आणि उद्योगांविषयी राज्यातील विद्यापीठांची भूमिका अभ्यासणे.
6. शेती आणि कृषि आधारित उद्योगांविषयी शेतकरी व बेरोजगारांना असलेल्या जागरूकता अभ्यासणे.

अभ्यासाची गृहितके:-

1. शेतकरी आणि कृषि आधारित उद्योगांकरिता असलेल्या सरकारी धोरणांचा त्यांना कितपत सकारात्मक फायदा होतो का?
2. कृषि आणि औद्योगिक धोरणे सदोष असल्यास शेतकरी आणि कृषि उद्योजकांना अपेक्षित लाभ होतो की नाही?

३. शेती आणि कृषि उद्योगांच्या साधना विषयी उपलब्ध असलेली माहिती, वापर, क्षमता आणि विकास यांचा परस्परसंबंध आहे की नाही?, हे तपासून पाहणे.

संशोधन आराखडा:-

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक किंवा संमिश्र संशोधन आराखड्याची निवड करण्यात येणार आहे. संशोधन म्हणजे तथ्य संकलन आणि त्यांचे विश्लेषण करणे होय. तथ्य संकलनासाठी प्रामुख्याने प्राथमिक स्त्रोत आणि दुय्यम स्त्रोत अशा दोन पध्दतींचा अवलंब केल्या जातो. प्राथमिक स्त्रोत यांमध्ये मुलाखत, प्रश्नावली तर दुय्यम स्त्रोतांमध्ये जनगणना, सरकारी प्रकाशन अहवाल, व्यक्तिगत नोंदी, मासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, पुर्वीचे संशोधने ही काहीशी उपयोगी ठरतात.

“मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्न आणि रोजगार वाढीसाठी कृषि उद्योग अथवा कृषिआधारित उद्योगांचा विश्लेषणात्मक अभ्यास” या शीर्षकाच्या प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक स्त्रोत आणि दुय्यम स्त्रोत या दोन्ही स्तोत्रांचा वापर केला जाणार आहे. या संशोधनासाठी यादृच्छिक क्षमता निवड पध्दतीचा अवलंब करून प्रस्तुत संशोधन कार्य पुर्ण करण्यात येणार आहे.

अभ्यासाची व्याप्ती:-

राज्यातील मराठवाडा या मध्यवर्ती विभागाची प्रस्तुत संशोधनासाठी निवड करण्यात आली आहे. मराठवाड्यातील आठही जिल्हे आणि त्यातील प्रत्येकी तीन तालुके, आणि तालुक्यातील दोनदोन गावे शेती आणि कृषि उद्योग अथवा कृषि आधारित उद्योग व्यवसाय यांचा अभ्यास केला जाणार आहे.

संशोधन कालावधी:-

संशोधन कालावधी हा 2019 ते 2024 या पाच वर्षांपर्यंतचा असणार आहे. तरी आवश्यकता असल्यास मागील काही संदर्भ आणि अहवालांच्या नोंदी वापरल्या जातील.

संशोधन अभ्यासाच्या मर्यादा:-

प्रस्तुत संशोधन शोधप्रबंध हा नमुना निवड पद्धतीवर आधारलेला असणार आहे. ही नमुना निवड पद्धती अवलंबल्यामुळे संशोधन कार्याला काही मर्यादा लागू पडू शकतात. तथ्य संकलनासाठी नमुना निवडीमध्ये घेतलेले शेतकरी, बेरोजगार, व्यापारी हे कमी शिकलेली अथवा अडाणी असल्याने त्यांच्याकडून प्राप्त होणारी माहिती ही अचूक असेल असेही नाही. तथा कृषी अधिकारी, कृषि तत्ज्ञ, जिल्हा उद्योग अधिकारी यांच्या देण्यात येणाऱ्या प्रतिसादावर माहितीमध्ये तफावत असू शकते. त्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी संकलित करण्यात आलेल्या माहितीला एक मध्य प्रमाण मानण्यात येईल.

प्रस्तावित प्रकरणे:-

“मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्न आणि रोजगार वाढीसाठी कृषि उद्योग अथवा कृषि आधारित उद्योगांचा विश्लेषणात्मक अभ्यास” या शोधप्रबंधाकरिता खालीलप्रमाणे प्रकरण व्यवस्था केली जाणार आहे.

प्रकरण पहिले: प्रस्तावना आणि संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रकरणात भारतीय शेती आणि कृषि उद्योग, व्यवसाय यांची पार्श्वभूमी, विषयाचे महत्त्व, उद्दिष्टे, गृहीतके, तथ्य संकलन, मर्यादा, अहवालाचा आराखडा इत्यादी घटकांचे विवेचन करण्यात येणार आहे. आणि निवडलेल्या संशोधन पद्धतीचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे: संशोधन साहित्याचे पुनर्विलोकन

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाच्या संदर्भात इतर अभ्यासकांनी केलेल्या अभ्यासाचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच कृषि उद्योग अथवा कृषि आधारित उद्योगांबाबत संशोधन साहित्याचे पुनर्विलोकन केले जाणार आहे.

प्रकरण तिसरे: कृषी उद्योग अथवा कृषि आधारित उद्योग भारत, महाराष्ट्र राज्य स्थिती

प्रस्तुत प्रकरणांमध्ये कृषी उद्योग अथवा कृषि आधारित उद्योग या संकल्पनेचा आढावा घेतला जाईल. तसेच देश, राज्यातील कृषी उद्योग यांचा आढावा घेतला जाईल.

प्रकरण चौथे: मराठवाड्यातील शेती आणि कृषि उद्योग अथवा कृषि आधारित उद्योगांचा आढावा

प्रस्तुत प्रकरणांमध्ये मराठवाड्यातील शेती आणि कृषि उद्योगांची ओळख, स्थिती आणि परिस्थिती, बाजार पेठ, दळणवळणाची साधने यांचा आढावा घेतला जाईल.

प्रकरण पाचवे: मराठवाड्यातील कृषि उद्योग व्यवसायांचा शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्न आणि रोजगार यात बदल झाल्याचा परिणाम

प्रस्तुत प्रकरणांमध्ये मराठवाडा या विभागातील कृषि उद्योग, व्यवसायांमुळे शेतकरी आणि कृषि उद्योजकांच्या आर्थिक स्थितीत बदल झाल्याचा आढावा घेतला जाईल.

प्रकरण सहावे: कृषि उद्योग अथवा कृषि आधारित उद्योग उभारणीसाठी योजना आणि धोरण

प्रस्तुत प्रकरणांमध्ये शेती आणि कृषि उद्योगांच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या कुठल्या योजना आणि धोरण, तसेच सुविधा उपलब्ध आहे.

यांचा अभ्यास केला जाणार आहे. उपरोक्त योजनांची विश्लेषणात्मक मांडणी हि सदरील प्रकरणात केल्या जाईल.

प्रकरण सातवे: निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात संशोधनात उपलब्ध झालेल्या माहिती साहित्य आणि मांडणीचा आढावा घेऊन संशोधनातील योग्य निष्कर्ष मांडले जाणार आहेत.

संदर्भ सुची :-

1. उद्योजकता मासिक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, अ३८, एमआयडीसी, स्टे जवळ, औरंगाबाद.
2. कृषिपणन, महाराष्ट्र कृषी पणन मंडळ पुणे, प्लाॅट आर 7, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे.
3. शेतीप्रगती मासिक, तेजस प्रकाशन, ट्रेड सेंटर, स्टे. रोड, नवी शाहूपुरी, कोल्हापूर 416001.
4. डॉ. संतोष खराडे, जयश्री पाटील, संशोधन पध्दती आणि संशोधन प्रकाशनाची नीतितत्वे, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव 2021.
5. डॉ. सुधीर बोधनकर, सामाजिक संशोधन पध्दती, साईनाथ प्रकाशन, नागपूर 2003.
6. खेती, हिंदी मासिक पत्रिका, भाकृअनुप प्रकाशन
7. फलफुल, हिंदी मासिक पत्रिका, भाकृअनुप प्रकाशन
8. लोकराज्य मासिक, माहिती व जनसंपर्क महा संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई - 32
9. दैनिक अग्रोवन
10. दैनिक लोकमत
11. दैनिक सकाळ

12. शेतकरी मासिक
13. www.icar.org.in
14. https://krishi.maharashtra.gov.inSeptember202 2कृषीविभाग-Maharashtra Gov
15. www.msme.gov.in
16. www.google.com
17. www.wikipedia.org
18. www.mpscmitra.in
19. www.mahayojana.in
20. www.drishtiias.in
21. www.mr.vikaspedia.in

संशोधक
श्री रविद्र भिकाजी भिसे

मार्गदर्शक
डॉ. भारत टी. निर्वल,
स्व. नितीन महाविद्यालय, पाथरी
ता. पाथरी, जिल्हा. परभणी.